महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

# नागरी सहकारी पतसंस्थांना कर्जमर्यादा वाढविण्याबाबत

## महाराष्ट्र शासन

सहकार व वस्त्रोद्योग विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक - सीसीआर - १५९६/१६०४४/प्र क्र. ४१०/७. सी.

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२, दिनांक १४ मार्च, १९९७,

## शासन परिपत्रक

नागरी सहकारी पतसंस्थांच्या आदर्श पोटनियमांना शासन पत्र क्रमांक - सीसीआर- ११९०/सीआर-४३/७ सी, दिनांक : २३-२-१९९३ अन्वये मंजुरी देण्यात आली होती. सदर पोटनियमातील पोटनियम क्रमांक - फ १.१० मधील परिशिष्ट "ब" प्रमाणे नागरी सहकारी पतसंस्थांनी त्यांच्या सभासदांना निरनिराळ्या कारणांसाठी मंजूर करावयाच्या कर्जमर्यादा निश्चित केलेल्या असून राज्यातील अनेक नागरी सहकारी पतसंस्थांकडून या कर्जमर्यादा वाढविण्यासंबंधी वारंवार विनंती करण्यात येत असल्यामुळे ही कर्जमर्यादा वाढवून देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. शासनाने आता यावर विचार करुन नागरी सहकारी पतसंस्थांना निरनिराळ्या कारणांसाठी मंजूर करावयाच्या कमाल कर्ज मर्यादामध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्यास मंजुरी दिली आहे.

| | |
|---|---|
| अ) राहत्या घराची दुरुस्ती / गृहपयोगी वस्तू, शिक्षण, लग्नप्रसंग, आजारपणातील किंवा आजारासाठी औषधोपचार / औषधी यासाठी वैयक्तिक जामीनकी कर्ज. | रु. ३०,००० |
| ब) दुचाकी वाहने, रिक्षा, टॅक्सी या नवीन वाहनासाठी कर्जे. | किंमतीच्या ७५ टक्के किंवा रु. १.५० लाख यापैकी कमी असलेली रक्कम.<br>सदर कर्ज मंजूर करताना खालील अटींचा समावेश करावा.<br>१) कर्जदाराने वाहन खरेदीची खात्री करुन दिल्याशिवाय संस्थेने अदा करु नये.<br>२) वाहन खरेदीची पावती संस्था व कर्जदार यांच्याकडे संयुक्तिक नावाने असावी.<br>३) विमा पॉलिसी संयुक्त नावाने असावी. |
| क) २ वर्षाच्या आतील जुनी दुचाकी वाहने, रिक्षा व टॅक्सी यांच्यासाठी कर्ज. | किंमतीच्या ५० टक्के अथवा रु. ७५,०००/- यातील जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |

| | |
|---|---|
| ड) सोने, चांदी यांच्या दागदागिण्यांच्या तारणावर | रुपये ५०,००० पर्यंत ४० टक्के दुराव्यावर. |
| इ) कर्ज रकमेच्या दुप्पट किंमती एवढ्या ३ महिन्या आतील स्टॉक, मशीनरी, तसेच स्थावर मालमत्ता कोलॅटरल सिक्युरिटी व दोन जामीनदारांसह छोट्या व्यवसायासाठी माल तारण कर्ज | रुपये १,००,०००/- पर्यंत व ५० टक्के दुराव्यावर सदर कर्ज, मंजूर करताना स्टॉकची पहाणी करण्यात यावी. तसेच अपेक्षित उलाढाल मंजूर रकमेच्या ५ पट असेल याची खात्री करावी. सदर कर्जाचे वार्षिक नूतनीकरण करावे. |
| फ) डॉक्टर, वकील, इंजिनिअर्स इ. व्यावसायिक व स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्तींना व्यवसायासाठी (स्थावर मालमत्तेच्या कोलॅटरल सिक्युरिटीवर तसेच २५ टक्के दुरावा व २ जामीनदारांच्या जामीनकीवर) | रुपये १,५०,०००/- पर्यंत. |
| ग) उपरोक्त कर्जाव्यतिरिक्त सभासदाला कुटूंबीयांचे निधन, आजारपण, धार्मिक कार्य या कारणाकरिता घ्यावयाचे आकस्मिक कर्ज. | रुपये २,०००/- |

तरी शासनाच्या सूचना सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच सर्व संबंधीत क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी नागरी सहकारी पतसंस्थाच्या निदर्शनास आणून द्याव्यात व आवश्यक वाटल्यास सदर संस्थांनी त्यांच्या उपविधीत दुरुस्त्या करुन घ्याव्यात. असेही त्यांना कळविण्यांत यावे.

सही/-
श्रीमती वै. ल. घोडके
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.
सहकार व वस्त्रोद्योग विभाग

जा. क्र. सीसीआर-११०२/प्र. क्र. ४०५/७-स,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई ३२
दिनांक ८ जानेवारी २००३

**विषय : नागरी सहकारी पतसंस्थांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७९ (अ) अन्वये द्यावयाचे निदेश.**

## आदेश

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०

ज्या अर्थी, पतसंस्थेकडील ठेवीवरील व्याजदर व कर्जावर आकारला जाणारा व्याजदर या दोन्ही व्याजदरामध्ये संपूर्ण राज्यात भिन्नता आढळून आलेली आहे व त्यामध्ये कोणतेही निकष घालून देण्यात आलेले नाहीत, आणि

ज्या अर्थी कर्ज वाटप करताना कर्जाची मर्यादा सर्व सहकारी संस्थांमध्ये भिन्न आहे आणि मार्जीन किती टक्के असावे याबाबत निश्चित तरतुदी त्यांच्या पोटनियमांमध्ये दिसत नाहीत आणि

ज्या अर्थी पतसंस्थांचे लेखापरिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी ठोस कार्यवाही करणे आवश्यक झाले आहे, आणि

ज्या अर्थी, वर नमूद केलेल्या बाबींचे सुसूत्रीकरण व्हावे यास्तव महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम, १९६० च्या कलम ७९ (अ) अन्वये शासनास प्राप्त झालेल्या अधिकारान्वये निदेश देणे आवश्यक आहे अशी शासनाची खात्री झालेली आहे.

त्या अर्थी, आता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७९ (अ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासन राज्यातील सर्व सहकारी पतसंस्थांना पुढीलप्रमाणे निदेश देत आहे.

१) पतसंस्थांकडील ठेवीवर व्याज दर १३% पेक्षा जास्त नसावा.
२) पतसंस्थांकडून देण्यात येणाऱ्या कर्जावर १६% पेक्षा जास्त व्याज दर आकारण्यात येऊ नये.
३) कर्ज वाटप करताना २०% मार्जीन ठेवून कर्ज वाटप करावे.
४) एका व्यक्तीला १० लाख किंवा पोटनियमात असलेली तरतूद यापैकी जे कमी असेल एवढे कर्ज वाटप करावे.
५) रु. १० कोटीच्या वर ठेवी असणाऱ्या सहकारी पतसंस्थांचे लेखापरिक्षण सनदी लेखापालाकडून करून घेण्यात यावे व अशा संस्थांवर किमान दोन संचालक व्यावसायिक किंवा सनदी लेखापाल असावेत.

या निदेशाचे अनुपालन करणे सर्व सहकारी पतसंस्थांना बंधनकारक आहे. या निदेशाचा भंग करणाऱ्या सहकारी पतसंस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र ठरतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
अवर सचिव, महाराष्ट्र शासन
सहकार व वस्त्रोद्योग विभाग

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

जा. क्र. ना. बँका / डी - ४/ ठेव व कर्ज व्याजदर / २००४
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक : १-४-२००४

# परिपत्रक

**विषय : नागरी सहकारी पतसंस्थांच्या ठेवी व कर्जावरील व्याजदराबाबत.**
**संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक सम दिनांक १-१-२००३**

राज्यातील नागरी सहकारी पतसंस्थांच्या ठेव व कर्जावरील व्याजाची तीव्र स्पर्धा टाळण्यासाठी नागरी सहकारी पतसंस्थांना आदर्श उपविधी लागू करण्यात आलेले असून पोटनियम क्र. फ-१-११ नुसार कर्जावरील व्याज व फ-१-१३ नुसार ठेवीवरील व्याजदर अनुक्रमे १६% व १३% करण्यात आलेले आहे. सध्याच्या जागतिक आर्थिक मंदीमुळे सर्वच वित्तीय संस्थांनी त्यांचे व्याजदर कमी केलेले आहेत. त्याचा परिणाम नागरी सहकारी पतसंस्थांच्या आर्थिक शिस्तीवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब विचारात घेता नागरी सहकारी पतसंस्थांच्या उपविधीत खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | पोटनियम क्र. फ-१-११ | कर्जावरील व्याजदर १५% |
| २) | पोटनियम क्र. फ-१-१३ | ठेवीवरील व्याजदर ११% |

सदर बदल हा दिनांक १-४-२००४ पासून होणाऱ्या ठेवी व कर्जावरील व्यवहारास लागू होईल. ही बाब संस्थांनी आपल्या नोटीस बोर्डावर तसे व वृत्तपत्रात प्रसिद्ध करावी. सदर सूचनांचे नागरी सहकारी पतसंस्थांकडून कोटेकोर पालन होईल याबाबत आवश्यक ती दक्षता घेण्यात यावी.

मा. सहकार आयुक्त
यांचे मान्यतेने

सही/-
उपनिबंधक, (नागरी बँका)
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

जा.क्र.ना. बँका/डी-४/पत/कर्ज/बेकायदा कपाती/२००५
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
दिनांक ३१ मे २००५

# परिपत्रक

## विषय : नागरी सहकारी पतसंस्था कर्जवाटप करताना कर्जातून करत असलेल्या बेकायदेशीर कपातीबाबत...

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, नागरी सहकारी पतसंस्था कर्जवाटप करताना कर्जवाटपाच्या रकमेतून शेअर्स रक्कम (२.५% ते ५%), ठेव रक्कम (२.५% ते ५%), इमारत निधी रक्कम (१% ते १.५%) तसेच संस्थेच्या संचालकांशी संबंधीत वेगवेगळ्या ट्रस्ट ॲक्ट खाली नोंदणीकृत करण्यात आलेल्या ट्रस्टसाठी निधी रक्कम (प्रत्येकी १%) याप्रमाणे कपाती करीत असतात. सदर कपातीचे प्रमाण एकूण कर्जरकमेच्या १०% ते १५% असते. वास्तविक कर्जदारास त्याच्या गरजेप्रमाणे कर्जवाटप होणे अत्यंत आवश्यक आहे. तथापी अशाप्रकारे कर्जाच्या रकमेतून मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर कपाती केल्यामुळे गरजेप्रमाणे कर्जदारास कर्ज पुरवठा होत नाही. प्रत्यक्षात जी रक्कम हातामध्ये मिळालेली नाही. त्या रकमेवरही व्याज कर्जदारास कर्जाची रक्कम संपेपर्यंत भरावी लागते. अनावश्यक भुर्दंड कर्जदारावर पडून प्रत्यक्ष मंजूर रकमेपेक्षा कमी रक्कम मिळूनही व्याज मात्र मंजूर रकमेवर भरावे लागत असल्याने व गरजेपेक्षा कमी रक्कम प्रत्यक्षात हातात पडल्याने त्याचा विनियोग योग्यरित्या होत नाही व सदरची कर्जरक्कम थकीत राहण्याची जास्त शक्यता असते. अशाप्रकारे कर्जदारास वेठीस धरण्याचे काम संस्था पातळीवर केले जाते ही बाब अतिशय गंभीर आहे.

या कार्यालयाने यापूर्वीही परिपत्रकाद्वारे शेअर्स रक्कम वगळता इतर कोणत्याही रकमेची कपात कर्ज रकमेतून करू नये अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. तथापि त्याची अंमलबजावणी संस्था पातळीवर होताना दिसून येत नाही. इमारत निधीची उभारणी ही झालेल्या नफ्यातून करण्याची सहकारी कायदा नियम व पोटनियमानुसार तरतूद आहे व सदर तरतूद संस्थांना बंधनकारक आहे. सदरबाबत सर्व नागरी सहकारी पतसंस्थांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, अशा प्रकारच्या बेकायदेशीर कपाती संस्था पातळीवर करण्यात येऊ नयेत.

संबंधीत विभागीय सहनिबंधक जिल्हा उपनिबंधक, सहाय्यक निबंधक यांनी अशा प्रकारच्या कपाती कार्यक्षेत्रातील नागरी पतसंस्थांमध्ये होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. अशा बाबी निदर्शनास आल्यावर संबंधीत संचालक मंडळाने सहकारी कायदा नियम व पोटनियमातील तरतुदीचे पालन केले

नाही असे समजून संबंधीत संचालक मंडळावर त्याची जबाबदारी निश्चित करणेबाबत कायदेशीर कारवाई केली जाईल असे पहावे.

आपणांस कळविण्यात येते की, सदर परिपत्रकीय सूचना आपल्या विभाग/जिल्ह्यातील सर्व नागरी सहकारी पतसंस्थांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

सही/-
अप्पर निबंधक, सहकारी संस्था,
(तपासणी व निवडणुका) महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण) (सर्व)
३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४) जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, (सर्व)

प्रत :

१) मा. सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा. सहकार आयुक्त यांना माहितीसाठी सविनय सादर
३) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. मुंबई,
प्रशासकीय कार्यालय १९८/३-९८ बाळकृष्ण चेंबर्स-ताराराणी चौक, कोल्हापूर

जा.क्र.ना.पत/डी-४/कृषीपत/कर्ज पु./२००५
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे कार्यालय,
दिनांक -

विषय : बिगरशेती / नागरी सहकारी पतसंस्थामार्फत कृषी क्षेत्रास करावयाच्या पतपुरवठ्याचे धोरण निश्चित करण्याबाबत.

संदर्भ : १) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.ना.बँका/ डी-४/आदर्श उपविधी/स्विकृती/२००२ दि. १८-११-२००२

२) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्र. सीसीआर - ११०२/प्र.क्र.५३१/ ७ स दि. २२-१२-२००५

# • परिपत्रक •

राज्यातील नागरी सहकारी पतसंस्थांचे उपविधी समानता असण्याच्या दृष्टीने या कार्यालयाने दिनांक २८-११-२००२ नुसार नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांना आदर्श उपविधी लागू करण्यात आलेले आहेत. त्यानुसार नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांमार्फत कृषि पतपुरवठा करण्याबाबत धोरण शासनाच्या विचाराधिन होते.

राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाद्वारे इंदिरा गांधी इन्स्टियूट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च या संस्थेस मागील एक ते दीड वर्षामध्ये शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्येबाबतची कारणे शोधून त्यावर उपाययोजना सूचविण्याकरिता शासनाने नियुक्त केले होते. सदर संस्थेने शासनास सादर केलेल्या अंतरिम अहवालामध्ये शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा हे त्यांच्या आत्महत्येचे प्रमुख कारण नमूद करुन ग्रामीण भागातील कर्जपुरवठ्याचे बळकटीकरण करुन त्याची व्याप्ती वाढविण्याची गरज व्यक्त करण्यात आली होती.

राज्यातील ग्रामीण भागात शेतकऱ्यांना पिक कर्जासाठी उपलब्ध असलेल्या कर्जपुरवठ्याचे प्रमाण कमी असून उपलब्ध पतपुरवठ्यावरील व्याजाचे दर जास्त आहेत. अशा परिस्थितीत राज्यातील बिगर शेती/नागरी सहकारी पतसंस्थांमार्फत कृषि क्षेत्रास करावयाच्या पतपुरवठ्याचे धोरण निश्चित करण्याची बाब अनिवार्य झाल्याने शासनाने सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्र. सीसीआर-११०२/प्र.क्र.५३१/७स दि. २२-१२-२००५ च्या निर्णययान्वये राज्यातील बिगरशेती/नागरी सहकारी पतसंस्थांना कृषि क्षेत्रास पतपुरवठा करण्यास मंजुरी दिलेली आहे.

राज्यातील बिगरशेती/नागरी सहकारी पतसंस्थांना कृषि क्षेत्रात पतपुरवठा करण्याचे धोरण निश्चित करण्याच्या दृष्टीने नागरी सहकारी पतसंस्थांनी स्विकारलेल्या आदर्श उपविधीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्याबाबत त्वरीत आदेश पारीत करण्यात यावेत.

| | | |
|---|---|---|
| १) | नागरी/ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांना कृषि क्षेत्रात वैयक्तिक शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी फक्त अल्प व मध्यम मुदती पतपुरवठा करण्याची मुभा राहील. | उद्देशामध्ये तशी सुधारणा करण्यात यावी. |
| २) | बिगरशेती/नागरी सहकारी पतसंस्थांना आपल्या एकूण पतपुरवठ्यापैकी २०% पतपुरवठा कृषि क्षेत्रास करण्याची मुभा राहील. | कर्ज विषयक परिशिष्ट क्रमांक क-१-२ मध्ये कर्ज विषयक नियमामध्ये तशी सुधारणा करण्यात यावी. |

| | | |
|---|---|---|
| ३) | बिगरशेती / नागरी सहकारी पतसंस्थांना शेतकऱ्यांना पीककर्जासाठी दिलेल्या कर्जाच्या रकमेतून भागभांडवलापोटी २% पेक्षा अधिक रक्कम कपात करता येणार नाही. | कर्ज विषयक नियम क्रमांक मध्ये तशी सुधारणा करण्यात यावी. |

तसेच या बाबत खालील अटीही विचारात घेण्यात याव्यात -

१) जिल्ह्यापेक्षा कमी कार्यक्षेत्र असणाऱ्या बिगरशेती / नागरी सहकारी पतसंस्थांना संबंधित जिल्ह्यात व जिल्ह्यापेक्षा जास्त कार्यक्षेत्र असणाऱ्या पतसंस्थांना त्यांचे कार्यक्षेत्रातील वैयक्तिक शेतकऱ्यांना फक्त पीक कर्ज अल्पमुदत कर्ज व मध्य मुदत कर्ज देण्याची परवानगी राहील.

२) प्रकरण निहाय तपासणी करुन सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे हे उपरोक्त (१) मध्ये नमूद केलेल्या प्रकारचे कर्ज कार्यक्षेत्राबाहेर स्वतंत्र शाखा उघडून वितरण करण्यास एखादद्या पतसंस्थेला गुणवत्तेवर परवानगी देऊ शकतील.

३) बिगरशेती / नागरी सहकारी पतसंस्थांना दिर्घ मुदतीचे कर्ज देण्याची परवानगी रहाणार नाही.

४) शेतकऱ्यांना नागरी सहकारी पतसंस्थांनी अल्पमुदत कर्जवाटप करताना संबंधीत कर्जदारांचे इ-करार व इतर अनुषंगीक कागदपत्रांची पूर्तता करुन घ्यावी.

५) शेतीकर्ज वाटप करताना सबंधीत कार्यक्षेत्रातील विविध कार्यकारी सहकारी संस्थांचा नाहरकत दाखला घ्यावा. तसेच त्या कार्यक्षेत्रातील नागरी पतसंस्थांचाही नाहरकत दाखला घेण्यात यावा.

६) शेतीसाठी अल्प व मध्यम मुदत कर्ज वाटप करताना दुहेरी कर्जवाटप होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७) शासन निर्णयानुसार पतसंस्थांना २% भागभांडवलापोटी कपात करता येईल. मात्र त्याव्यतीरिक्त इतर कोणताही निधी कपात करण्यात येऊ नये.

८) मध्यम मुदत कर्जवाटप करताना संबधीतांची मालमत्ता ताबेगहाण ठेवण्यात यावी व इतर अनुषंगीक कागदपत्रांची पूर्तता करुन घेण्यात यावी.

९) शासनमान्य टेक्निकल ग्रुप कमिटीने / जिल्हा मध्यवर्ती बँकेने शेती हंगामासाठी ठरविलेल्या प्रति हेक्टरी पीक कर्ज दरानुसार कर्ज वाटप केले पाहिजे.

राज्यातील बिगरशेती / नागरी सहकारी पतसंस्थांना कृषि क्षेत्रास पतपुरवठा करण्यास उपलब्ध करुन दिलेल्या संधीचा वापर करण्याची बाब ऐच्छिक स्वरुपाची राहीले याकरिता शासन कोणत्याही प्रकारचे दायित्व स्विकारणार नाही.

राज्यातील बिगरशेती / नागरी सहकारी पतसंस्थांनी कृषि क्षेत्रास उपलब्ध करुन दिलेल्या पतपुरवठ्याची जिल्हानिहाय माहिती संकलित करुन ती या कार्यालयास सादर करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था / विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांची राहील. तरी उपरोक्त बाब आपल्या जिल्ह्यातील नागरी / ग्रामीण सहकारी पतसंस्थांच्या निदर्शनास आणून देऊन सदर सूचना पतसंस्था त्यांच्या पोटनियमात समाविष्ट करतील याबाबत दक्षता घेण्यात यावी.

डॉ. शैलेश कुमार शर्मा
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति, १) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व), २) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)

जा. क्र. ना. बँका/डी ४/ठेव व कर्जव्यवहार/०६
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय
दिनांक २४-७-२००६

# परिपत्रक

**विषय : नागरी सहकारी पतसंस्थेच्या/सेवक सहकारी पतसंस्थांचे ठेवी व कर्जावरील व्याजदराबाबत**

**संदर्भ : या कार्यालयाचे समक्रमांकाचे परिपत्रक दि. १-४-२००४**

राज्यातील नागरी सहकारी पतसंस्थांच्या ठेव व कर्जावरील व्याजाची तीव्र स्पर्धा टाळण्यासाठी नागरी सहकारी पतसंस्थांना आदर्श उपविधी लागू करण्यात आलेले असून पोटनियम क्र. फ १.११ नुसार कर्जावरील व्याज व फ १.१३ नुसार ठेवीवरील व्याजदर अनुक्रमे १६% व १३% करण्यात आलेले होते. सध्याच्या जागतिक आर्थिक मंदीमुळे सर्वच वित्तिय संस्थांनी त्यांचे व्याजदर कमी केल्याने या कार्यालयाने दि. १-४-२००४ च्या परिपत्रकान्वये नागरी सहकारी पतसंस्थांच्या उपविधीत बदल करून पोटनियम क्र. फ १.११ मधील कर्जावरील व्याजदर हा १५% तर पोटनियम क्र. ड. १.१३ मधील ठेवीवरील व्याजदर हा ११% इतका केलेला होता.

सद्य परिस्थितीत आर्थिक मंदीमुळे सर्वच वित्तिय संस्थांनी त्यांचे व्याजदर आणखीन कमी केलेले असून त्याचा परिणाम नागरी सहकारी पतसंस्थांच्या आर्थिक शिस्तीवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत नागरी सहकारी पतसंस्थांचे ठेवीचे व्याजदर कमी करणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेता नागरी सहकारी पतसंस्थांच्या उपविधीत खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १) पोटनियम क्र. फ १.१३ | ठेवीवरील व्याजदर १०% |

सदर बदल हा दि. १-८-२००६ पासून होणाऱ्या ठेवीवरील व्यवहारास लागू राहील. ही बाब संस्थांनी आपल्या नोटीस बोर्डावर तसेच वृत्तपत्रात प्रसिद्ध करावी. तसेच संस्थेच्या पोटनियमामध्ये तशी दुरुस्ती करण्यात यावी. सदर सूचनांचे नागरी सहकारी पतसंस्थांकडून काटेकोर पालन होईल याबाबत आवश्यक ती दक्षता घेण्यात यावी.

सर्व विभागीय सहनिबंधक/जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, सदर बाब आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व पतसंस्थांच्या निदर्शनास आणून द्यावी व आपल्या विभागामध्ये/जिल्ह्यामध्ये सदर परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही होईल असे पहावे. त्याबाबतची संपूर्णपणे जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

मा. सहकार आयुक्त यांचे मान्यतेने

सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३) अध्यक्ष/कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., मुंबई
४) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन.

जा. क्र. डी.-४/ना. स. पत पत/कर्जमर्यादा/०६
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
दिनांक २१-१२-२००६

विषय : नागरी सहकारी पतसंस्थांना द्यावयाची कर्जमर्यादा वाढीबाबत
संदर्भ : आदर्श उपविधी आदेश दि. १८-१२-२००२

# परिपत्रक

महाराष्ट्र राज्यात एकूण २५,०२० इतक्या नागरी/पगारदार सहकारी पतसंस्था आहेत. त्यापैकी राज्यस्तरावर अंदाजे ४८६ इतक्या नागरी/पगारदार सहकारी पतसंस्था आहेत. नागरी सहकारी पतसंस्थांना या कार्यालयाने दि. १८-१२-२००२ नुसार आदर्श उपविधी लागू केलेले आहेत.

१) राज्यात राज्यस्तरीय कार्यक्षेत्र असलेल्या व ज्यांच्या ठेवी १०० कोटीच्या वर आहेत अशा बऱ्याच संस्थांकडून त्यांचा सी. डी.रेशो प्रमाण राखण्याच्या दृष्टीने कर्ज मर्यादा वाढवून मिळणेबाबत पोटनियम-दुरुस्ती प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त होतात. या कार्यालयाने विहित केलेल्या (२५ लाख) मर्यादेपेक्षा जास्त कर्जमंजुरी करता येत नसल्याने अशा संस्थांचे पोटनियम नामंजूर करावे लागतात. नागरी सहकारी पतसंस्थांना त्यांच्या पोटनियमात समानता असावी म्हणून आदर्श उपविधी लागू करण्यात आलेले आहेत. त्यानंतर सहकारी कायदा पोटनियम व संस्थांच्या आर्थिक उलाढाली मोठ्या प्रमाणावर वाढलेल्या आहेत. याशिवाय सन २००६ या आर्थिक वर्षापासून नागरी सहकारी पतसंस्थांना एन.पी.ए. तरतूद लागू करण्यात आलेली आहे. त्यामुळे ठेवीच्या प्रमाणात कर्ज वाटप होणे अत्यंत गरजेचे झालेले आहे. तसेच आत्ता खाजगी वित्तिय संस्था या १००% कर्जपुरवठा करू लागल्या आहेत अशा परिस्थितीत कर्जदार खाजगी वित्तिय संस्थांकडे कर्जमागणी करु लागल्याचे दिसून येत आहे. परिणामी नागरी सहकारी पतसंस्थांकडील कर्जप्रमाण घटत आहे. त्याचा परिणाम नागरी सहकारी पतसंस्थांच्या आर्थिक स्थितीवर होत आहे. उपरोक्त परिस्थिती पहाता ज्या संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत अशा संस्थांबाबत त्यांची कर्जमर्यादा वाढ करणे उचित वाटते. त्यासाठी खालीलप्रमाणे बदल कर्जे परिशिष्ट क्र. २ मध्ये करण्यात येत आहे.

| अ. क्र. | ठेवी | कर्जमर्यादा |
|---|---|---|
| १ | रु. १०० ते ३०० कोटी | रु. ४० लाख |
| २ | रु. ३०० कोटीच्या वर | रु. ७५ लाख |

२) आदर्श उपविधी क्र. फ १.१ नुसार नागरी सहकारी पतसंस्थांची संचालक मंडळ रचना खालीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | संस्थेच्या सभासदातून निवडलेले | ८ |
| २) | भटक्या विमुक्त जाती/जमाती व विशेष मागास प्रवर्ग राखीव | १ |
| ३) | इतर मागासवर्गीयांसाठी राखीव | १ |
| ४) | अनुसूचित जाती/जमाती सभासदांसाठी राखीव | १ |
| ५) | दुर्बल घटकांसाठी राखीव | १ |
| ६) | महिलांसाठी | १ |
| ७) | तज्ञ संचालक स्विकृत | २ |
| | एकूण | १५ |

ज्या नागरी सहकारी पतसंस्थांचे कार्यक्षेत्र राज्यस्तर आहे व ज्या नागरी सहकारी पतसंस्थांच्या ठेवी १०० कोटीपेक्षा जास्त आहेत अशा संस्थांच्या शाखांची संख्या व वाढता आर्थिक व्याप विचारात घेता संस्थेवर आवश्यक तेवढे प्रतिनिधीत्व असणे संस्थेच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यक असल्याने संस्थांची सदर गरज विचारात घेता पोटनियम क्र. फ १.१ मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | संस्थेच्या सभासदातून निवडलेले | ११ |
| २) | भटक्या विमुक्त जाती/जमाती व विशेष मागास प्रवर्ग राखीव | १ |
| ३) | इतर मागासवर्गीयासाठी राखीव | १ |
| ४) | अनुसूचित जाती/जमाती सभासदांसाठी राखीव | १ |
| ५) | दुर्बल घटकासाठी राखीव | १ |
| ६) | महिलांसाठी | २ |
| ७) | तज्ञ संचालक स्विकृत | २ |
| | एकूण | १९ |

स्थळ प्रतिवर मा. सहकार आयुक्त
व निबंधक यांचसही असे

सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

जा. क्र. ना. बँका/डी-४/पतसंस्था/तपासणी/०७
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक १३ सप्टेंबर २००७

# परिपत्रक

काही वर्तमानपत्रात लेखा समितीच्या कामकाजाबाबत विविध बातम्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. सदर बातमीमध्ये सदस्य, सचिव, राज्यस्तरीय लेखा समिती यांनी विविध पतसंस्था व बँका यांची तपासणी घेणेचे अनुषंगाने व लेखापरिक्षण अहवाल छाननी करणेचे अनुषंगाने करीत असलेल्या एकंदरीत कामकाजाबाबत प्रसिद्ध झालेल्या बातमीमध्ये सदर कार्यालयाकडून विविध बँका व पतसंस्थांची तपासणी घेण्यात येत असल्याबाबत व अशा बँका व पतसंस्थांकडून पैशाची मागणी करण्यात येत असल्याबाबतचे वृत्त प्रसिद्ध झालेले आहे.

राज्यातील ठेवी परत मिळत नसलेल्या सहकारी बँका/पतसंस्थांच्या विरोधात ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे यांनी सुरू केलेल्या अंदोलनाचे अनुषंगाने या कार्यालयाने ठेवी परत मिळत नसलेल्या बँका/पतसंस्थांच्या तपासण्या, चाचणी लेखापरीक्षण इ. बाबत कार्यवाही सुरू केलेली असून, त्याबाबतचे निर्देश सर्व विभागीय सहनिबंधक व जिल्हा उपनिबंधक यांना देण्यात आलेले आहेत. त्यानुषंगाने संबंधीत निबंधकांनी कामकाजही सुरू केलेले आहे. अशा परिस्थितीत या कार्यालयाच्या आदेशाचा गैरवापर करून किंवा या कार्यालयाच्या सूचनांचा गैरवापर इतर कार्यालयाकडून करण्यात येवून ती कार्यालयेही नागरी बँका/पतसंस्थांच्या तपासणीच्या व लेखापरीक्षणाच्या नावाखाली अशा बँका/पतसंस्थांना भेटी देण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता, राज्यातील नागरी बँका/पतसंस्थांनी फक्त या कार्यालयाच्या किंवा संबंधीत निबंधक यांचेच आदेशानुसार त्यांचे रेकॉर्ड तपासणीकामी लेखापरीक्षक यांना द्यावे.

स्थळ प्रतीवर मा. सहकार
आयुक्त यांची सही असे.

**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता**

प्रत :

१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३) महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.
४) पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.
५) मुंबई पूर्व उपनगरे नागरी सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन लि.
६) मुंबई पश्चिम उपनगरे नागरी सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन लि.
७) जिल्हा सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन लि.

जा. क्र. ना. बँका/डी-४/पतसंस्था/ठेवीपरत/कार्यवाही/०८
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक १४ जानेवारी २००८

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन/लेखापरीक्षण) (सर्व)

२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

३) जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था (सर्व)

४) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सर्व)

## विषय : राज्यातील नागरी सहकारी बँका/पतसंस्थांमधील ठेवी परत करणेचे अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत...

राज्यातील नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्थांमध्ये सामान्य ठेवीदारांच्या ठेवी आहेत. काही संस्थांच्या गैरव्यवस्थापन व गैरव्यवहारामुळे ठेवी परत मिळत नसून त्यासाठी राज्यभर जनआंदोलन सुरू झाले आहे. ठेवी परत देणेचे अनुषंगाने सहकार विभागाने मागील सहा महिन्यापासून कार्यवाहीही सुरु केलेली असून काही प्रमाणात ठेवी परतही केलेल्या आहेत. त्यानुषंगाने मा. आण्णा हजारे यांनी सुरू केलेल्या आंदोलनाचे अनुषंगाने आत्तापर्यंत त्यांचेबरोबर व शासनाने निर्माण केलेल्या राज्यस्तरीय कृती समितीबरोबर झालेल्या विविध सभेंच्या अनुषंगाने कार्यवाही करून पाठपुरावाही करण्यात येत आहे.

याबाबत मा. अण्णा हजारे यांचेशी दि. १३-१-२००८ रोजी झालेल्या सभेत ठरल्याप्रमाणे खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) अडचणीत असलेल्या पतसंस्थेतील/बँकेतील गरजू ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याकरिता पुढील तीन महिन्यासाठी एक कालबद्ध कार्यक्रम राबविण्यात यावा. सदर कार्यक्रमानुसार अशा पतसंस्थांमधील कर्जदारांकडून प्रभावी कर्ज वसुली करून, वसूल झालेल्या कर्ज रकमेतून गरजू ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यात याव्यात.

२) प्रत्येक जिल्ह्यात जिथे अशा अडचणीत असलेल्या संस्थांची संख्या जास्त आहे तेथे जिल्हा उपनिबंधक यांचे मार्गदर्शनाखाली ठेवीदारांचे प्रतिनिधी, संबंधित संस्था चालक, सहाय्यक निबंधक व मा. अण्णा हजारे यांचे कार्यकर्त्यांसह दर सोमवारी दुपारी ३.०० वाजता अडचणीत असलेल्या संस्था व ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंबंधी आढावा घेण्यात यावा. सदर सभेमध्ये अडचणीतील संस्थेचे संचालक, ठेवीदार संघटनेचे प्रतिनिधी, आ. अण्णा हजारे यांचे संघटनेचे प्रतिनिधी संबंधित सहाय्यक निबंधक, अडचणीतील संस्थेवरील प्रशासक/अवसायक उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी. सदर सभेमध्ये खालील बाबींवर सविस्तर चर्चा करावी.

अ) संस्थानिहाय कर्ज वसुलीची स्थिती, वसुलीबाबत करण्यात येत असलेली कार्यवाही.

ब) प्राप्त वसुलीतून (Hardship Cases) मध्ये केलेले वाटप.

क) ठेवीदार प्रतिनिधी व उपस्थितांशी चर्चा करून महिन्यातील दोन ते चार दिवस निश्चित करून त्या

तारखेलाच ठेवींचे वाटप होईल ही बाब निश्चित करणे, तसेच ज्या ठेवीदारांना पैसे त्या महिन्यात मिळणार आहेत त्यांची यादीही जाहीर करावी.

ड) धनदांडगे, संचालक यांच्यावर करण्यात आलेल्या फौजदारीबाबत

वरीलप्रमाणे सर्व कार्यवाही होईल याबाबत सर्व विभागीय सहनिबंधक व जिल्हा उपनिबंधक यांनी दक्षता घ्यावी. तसेच जिल्हा उपनिबंधक धुळे, जळगांव, नाशिक, कोल्हापूर व सांगली या कार्यालयाने सदर सभेचा वृत्तांत दर मंगळवारी या कार्यालयास सादर करावा.

३) मा. अण्णा हजारे यांचे प्रतिनिधी/कार्यकर्ते व ठेवीदार हे अडचणीत असलेल्या ठेवीदारांची नावे व धनदांडग्या कर्जदारांची माहिती देतील. त्यांनी दिलेल्या माहितीवर तात्काळ पुढील कार्यवाही करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल नियमितपणे दर आठवड्याला या कार्यालयास सादर करण्यात यावा.

४) अडचणीतील व कमकुवत संस्थांना मदतीकरिता चांगल्या संस्थेबरोबर त्यांचे गट तयार करून कर्जदार व ठेवीदार यांचे पालकत्व स्विकारुन कर्जदारांना नवीन कर्ज चांगल्या संस्थेतून उपलब्ध करून तसेच पतसंस्थांतील ठेवी कर्जदारांना कर्ज देऊन परत केल्या जातील यासाठी त्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही जिल्हास्तरावर सत्वर करण्यात येऊन त्याप्रमाणे अडचणीतील पतसंस्थांचे मोठे व चांगले वसूल होण्याजोगे कर्ज सक्षम पतसंस्थांनी (Take Over) करण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी.

५) ज्या लेखापरीक्षक/सी. ए. यांनी पतसंस्थांचे/बँकांचे लेखापरीक्षण करताना कसूर केलेली आहे असेल त्यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशा सी. ए. ची नावे (IRWA) या सी. ए. च्या संस्थेस कळवून अशा दोषी सी. ए. वर सत्वर कार्यवाही करणेबाबतचा प्रस्ताव त्यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावा.

वरीलप्रमाणे सत्वर कार्यवाही करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

तसेच जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक, जळगांव, धुळे, कोल्हापूर व सांगली यांनी उपरोक्तप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा दर सोमवारी न चुकता या कार्यालयास सादर करावा. सदर माहिती ही वरीष्ठांना सादर करावयाची असल्यामुळे उपरोक्त जिल्हा उपनिबंधक यांनी त्यांचेकडील वरील विषयाचे अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल दर सोमवारी या कार्यालयास प्राप्त होईल याची स्वत: दक्षता घ्यावी.

**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

जा.क्र. : ना.पत/डी–४/ना.पत/मोठे कर्ज/म. उल्ल/०८
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे–१ यांचे कार्यालय,
दिनांक ३१ जानेवारी २००८

# परिपत्रक

**विषय : नागरी सहकारी पतसंस्थांनी कर्ज मर्यादेचे उल्लंघन करुन दिलेल्या मोठ्या कर्जाबाबत.**

महाराष्ट्र राज्यात एकूण २५,८२५ इतक्या नागरी/पगारदार सहकारी पतसंस्था आहेत. त्यापैकी राज्यस्तरावर अंदाजे ५६० इतक्या नागरी/पगारदार सहकारी पतसंस्था आहेत. नागरी सहकारी पतसंस्थांना या कार्यालयाने दि. १८–१२–२००२ नुसार आदर्श उपविधी लागू केलेले आहेत. त्यानुसार संस्थांना कमाल कर्ज मर्यादा निश्चित केलेली आहे. (स्वनिधीच्या प्रमाणात मात्र कमाल रु. २५.०० लाख)

तद्नंतर या कार्यालयाच्या दि. २७–१२–२००६ च्या परिपत्रकान्वये पतसंस्थांना ठेवींच्या प्रमाणात कर्ज मर्यादा ठरवून दिलेली आहे. त्यानुसार रु. १०० ते ३०० कोटी पर्यंत ठेवी असलेल्या पतसंस्थांना कमाल कर्ज मर्यादा रु. ४० लाख तर रु. ३०० कोटीच्या वर ठेवी असलेल्या संस्थांना कमाल कर्ज मर्यादा रु. ७५ लाख ठरवून दिलेली आहे.

तथापि, मा. आण्णा हजारे यांनी पतसंस्थेतील ठेवी परत मिळत नसल्याचे अनुषंगाने सुरु केलेले आंदोलनाचे अनुषंगाने निर्माण करण्यात आलेल्या TAFCOCS च्या सभेत आढावा घेतला असता, अनेक पतसंस्थांनी त्यांचे कमाल कर्ज मर्यादेचे उल्लंघन करुन मोठ मोठी कर्जे दिलेली असल्याचे व अशी मोठ मोठी कर्जाची वसुली योग्य प्रकारे होऊ न शकल्यामुळे पतसंस्था अडचणीत आल्याचे निदर्शनास आलेले आहे.

तसेच अनेक पतसंस्था अशी मोठ मोठी कर्ज देण्याचे अनुषंगाने प्रस्ताव मंजुरीस्तव या कार्यालयाकडे सादर करीत असतात.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, पतसंस्थांचा मूळ उद्देश हा लहान कर्जदारांना छोटी–छोटी कर्जे देणे हा आहे. तसेच या कार्यालयाने कमाल कर्ज मर्यादा ठरवून दिलेली आहे. त्यामुळे सर्व पतसंस्थांना असे निर्देश देण्यात येतात की, त्यांनी यापुढे कर्ज मर्यादेचे उल्लंघन करुन कर्जे देऊ नयेत. तसेच यापूर्वी अशी कर्जे दिलेली असतील तर ती दिनांक ३१ मार्च २००८ पर्यंत मर्यादेत करुन घ्यावीत. तसेच मोठी कर्जे मंजूर करणेबाबतची कोणतेही प्रस्ताव मंजुरीस्तव या कार्यालयाकडे पाठविण्यात येऊ नयेत.

अशी मोठी कर्ज मंजूर केल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संचालक मंडळाची राहील व संचालक मंडळावर पुढील कार्यवाही करण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.

सही/–
**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३) अध्यक्ष/कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, मुंबई
४) सहायक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था पतसंस्था फेडरेशन

राज्यातील नागरी सहकारी बँका/पतसंस्थांमधील ठेवी परत करण्याच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय कृती समिती स्थापन करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक, युआरपी-१५०७/शिकाना प्र.क्र. ४७/७-स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक १३-८-२००८

**प्रस्तावना :**

राज्यातील नागरी सहकारी बँका/पतसंस्था यांच्या कामकाजाबाबत वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या तक्रारी, त्यानुषंगाने सहकार विभागामार्फत सहकार कायद्याच्या विविध कलमांतर्गत करण्यात येणारी कार्यवाही, सदर कामात सातत्य रहावे व या कामाला गती मिळावी या उद्देशाने अशा प्रकारच्या प्राप्त तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी श्री. रत्नाकर गायकवाड, तत्कालिन प्रधान, सचिव (सहकार) तथा महानगर आयुक्त, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय क्र. सीसीआर-११०७/प्र.क्र. ५८३/७-स, दि. ७-८-२००७ अन्वये राज्यस्तरीय कृती समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. शासन निर्णय दि. १३-८-२००८ नुसार सदर समिती श्री. सुधीरकुमार गोयल, (भा.प्र.से.) प्रधान सचिव (सहकार) यांचे अध्यक्षतेखाली कार्यरत आहे.

तथापि, दिनांक ५-११-२००७ रोजी राज्यस्तरीय कृती समितीच्या बैठकीत ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी सहकार, महसूल व गृह विभाग यांच्या समन्वयाची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. त्या अनुषंगाने प्राप्त तक्रारीवरील कार्यवाहीच्या कामामध्ये सातत्य रहावे, कामास गती मिळावी या उद्देशाने तक्रारींवर कार्यवाही करुन ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय कृती समिती स्थापन करण्याबाबत विचारविनिमय झाला. त्यानुसार नागरी सहकारी बँका/पतसंस्था यांचे कामकाजाबाबत तसेच ठेवदारांच्या ठेवीबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निराकरण करुन ठेवी परत करण्याच्या कामकाजास गती मिळावी यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कृती समिती स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

## शासन निर्णय :

उपरोक्त परिस्थितीत जिल्ह्यातील नागरी सहकारी बँका/पतसंस्थांच्या कामकाजासंबंधी तसेच नागरी सहकारी बँका/पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या ठेवीबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निराकरण करुन ठेवीदारांच्या मिळत नसलेल्या ठेवी परत करण्याच्या उद्देशाने कामकाजास गती मिळण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली पुढील सदस्यांचा समावेश असलेली जिल्हास्तरीय कृती समिती गठीत करण्यास शासनाची मंजुरी देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| जिल्हा पोलिस अधिक्षक/पोलिस आयुक्त | सदस्य |

| | |
|---|---|
| जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था | सदस्य |
| अध्यक्ष, जिल्हा पतसंस्था फेडरेशन | सदस्य |
| ठेवीदारांचा एक प्रतिनिधी (जिल्हाधिकारी निवडतील तो) | सदस्य |
| श्री. आण्णा हजारे प्रणित संघटना | सदस्य |
| जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था | सदस्य सचिव |

**सदर जिल्हास्तरीय कृती समितीचे कामकाज खालीलप्रमाणे राहील.**

१) चाचणी लेखापरीक्षण/वैधानिक लेखापरीक्षणाअंती प्रथम सूचना अहवाल (F.I.R.) दाखल करावयाची प्रकरणे.

२) प्रभावशाली व मोठ्या कर्जदाराच्या वसुलीसाठी पोलीस संरक्षण उपलब्ध करुन देणे.

३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१/९१ प्रकरणांतील आदेशानंतर विशेष वसुली अधिकाऱ्यांनी कळविल्याप्रमाणे कर्जदाराचे स्थावर मालमत्तेवर बोजाची नोंद तातडीने करुन घेणे.

४) सदर स्थावर मालमत्ता विक्री केलेल्या/करावयाच्या मालमत्तेचा ताबा घेणे.

५) 'इ' कराराप्रमाणे नागरी सहकारी पतसंस्थांच्या कर्जदाराचे वारसदारांच्या मालमत्तेवर बोजा नोंद करणे.

६) तारण मालमत्तेची विक्री/हस्तातरण/दान/बक्षीस/नवीन बोजा नोंद करणे व अशी मालमत्ता परवानगीशिवाय विक्री झाली असल्यास अवैध ठरविणे.

७) महसूल विभागाची ७/१२, ८-अ चे उतारे लवकरात लवकर प्राप्त करुन देणे.

८) शेतजमिनीचे/बिगर शेती स्थावर मालमत्तेचे मूल्यांकन सक्षम अधिकाऱ्याने ७ दिवसात देणे.

सदर समिती त्यांचा अहवाल वेळोवेळी राज्यस्तरीय कृतिसमिती तसेच शासनाला सादर करेल.

**सदर समितीस महसूल विभाग खालील प्रकारे सहकार्य करील.**

१) पतसंस्थेत मोठ्या प्रमाणावर विनातारण कर्जे देण्यात आलेली दिसून येत आहेत. त्यासाठी कर्जदारांच्या स्थावर मालमत्तेचा शोध घेण्याबाबत महसून विभागाकडील अभिप्राय उपलब्ध करुन देणे.

२) बेनामी किंवा गैरव्यवहाराद्वारे कर्जे घेऊन कर्जाची/संपत्तीची जवळच्या नातेवाईकांमध्ये विल्हेवाट लावण्याचे प्रकार घडले आहेत. अशा प्रकरणात गैरव्यवहारात बाहेर पडण्यासाठी संपत्ती हस्तांतरीत केली असल्यास त्याचा शोध घेणे.

३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ व कलम १५६ अन्वये कर्जदाराच्या मालमत्तेच्या लिलावातून वसुली करण्यात येते. यासाठी कर्जदारांच्या मालमत्तेचा शोध घेणे, मालमत्तेचे मूल्यांकन करणे व अपसेट प्राईज निश्चित करणे.

४) गैरव्यवहार केलेल्या संचालकांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम८८ अन्वये आर्थिक

जबाबदारी निश्चित करण्यात येते. आर्थिक जबाबदारी निश्चित झाल्यावर संचालकांची मालमत्ता शोधून तीचा लिलाव केला जातो. त्यासाठी संचालकांची मालमत्तेची माहिती उपलब्ध करुन देणे.

**समितीचा कार्यकाल :**

सदर समितीचा कार्यकाल ६ महिन्यांचा राहील. आवश्यकतेनुसार सहकार विभागाकडून मुदत वाढ देण्यात येईल. सदर समितीची सभा महिन्यातून २ वेळा होईल किंवा आवश्यकता असल्यास अधिक वेळा होईल.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०८१३१३५५०४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.
(डॉ. सुधीरकुमार गोयल)
प्रधान सचिव (सहकार व पणन)

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी
२) सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त
३) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) अप्पर निबंधक, सहकारी संस्था (तपासणी व निवडणूक), सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, पुणे
५) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
६) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण)
७) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
८) अध्यक्ष, जिल्हा पतसंस्था फेडरेशन
९) निवड नस्ती

प्रत माहितीस्तव :

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
२) मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
३) मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
४) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
५) मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
६) श्री. आण्णा हजारे, मु.पो. राळेगणसिद्धी, ता. पारनेर, जि. अहमदनगर.
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ३२.
८) मा. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ३२.
९) मा. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ३२.
१०) मा. प्रधान सचिव (सहकार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ३२.

जा.क्र. : ना.बँका/डी-४/बँक-पतसंस्था/ठेवी परत/
जि.स्त.कृ.स./सुचना/०८
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक १९ ऑगस्ट २००८

# परिपत्रक

**विषय : राज्यातील नागरी सहकारी बँका/पतसंस्थामधील ठेवी परत करण्याच्या शासनाने स्थापन केलेल्या जिल्हास्तरीय कृती समितीचे अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**संदर्भ : शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग निर्णय क्र. युआरबी-१५०७/शिकाना प्र.क्र. ४७/७-स दिनांक १३-८-२००८**

राज्यातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थामधील ठेवी परत मिळत नसल्याच्या अनुषंगाने मागील सुमारे १ वर्षापासून जन आंदोलन सुरु झालेले असून सदर प्रकरणी कायद्यातील विविध कलमांतर्गत कारवाई करण्यासाठी शासनाने श्री. रत्नाकर गायकवाड, तत्कालीन प्रधान सचिव (सहकार) तथा महानगर आयुक्त, मुंबई विकास प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कृती समितीची स्थापना केली होती. तद्नंतर शासनाने दिनांक १३-८-२००८ च्या आदेशान्वये उक्त समितीवर डॉ. सुधीरकुमार गोयल, भा.प्र.से. प्रधान सचिव (सहकार व पणन) यांची अध्यक्ष म्हणन नियुक्ती केलेली आहे.

२) राज्यातील नागरी सहकारी बँका/पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी सहकार, महसूल व गृह विभाग यांच्या समन्वयाची आवश्यकता असल्याने त्यादृष्टीने जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कृती समिती गठित करण्यास शासनाने सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग निर्णय क्र. युआरबी-१५०७/शिकाना प्र.क्र. ४७/७-स दिनांक १३-८-२००८ अन्वये मंजुरी दिलेली असून त्यानुसार खालीलप्रमाणे जिल्हास्तरावर समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| ब) | जिल्हा पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त | सदस्य |
| क) | जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था | सदस्य |
| ड) | अध्यक्ष जिल्हा पतसंस्था फेडरेशन | सदस्य |
| ई) | ठेवीदारांचा एक प्रतिनिधी (जिल्हाधिकारी निवडतील तो) | सदस्य |
| फ) | श्री. आण्णा हजारे प्रणित संघटना सदस्य | सदस्य |
| ग) | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था | सदस्य सचिव |

३) सदर जिल्हास्तरीय कृती समितीने खालील बाबतीत कामकाज करावयाचे आहे.

१) प्रभावशाली व मोठ्या कर्जदारांच्या वसुलीसाठी विशेष प्रयत्न करुन कर्ज वसुली.

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९१ प्रकरणातील आदेशानंतर विशेष वसुली अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे कर्जदारांच्या स्थावर मालमत्तेवर संबंधीत पतसंस्थेच्या/बँकेच्या बोजाची नोंद तातडीने घेण्यासाठी प्रयत्न करुन कार्यवाही.

३) सदर स्थावर मालमत्ता जर संबंधीत कर्जदाराने विक्री केली असल्यास/करण्याच्या बेतात असल्यास त्यावर ताबा घेण्यासाठी कार्यवाही.

४) 'इ' कराराप्रमाणे नागरी सहकारी पतसंस्थांच्या/बँकेच्या कर्जदारांचे वारसदारांच्या मालमत्तेवर बोजा नोंद करणे.

५) तारण मालमत्तेची विक्री/हस्तांतरण/दान/बक्षीस/नवीन बोजा नोंद करणे व अशी मालमत्ता परवानगीशिवाय विक्री झाल्यास अवैध ठरविणेबाबत कार्यवाही.

६) महसूल विभागाचे ७/१२ व ८-अ चे उतारे लवकरात लवकर प्राप्त करुन घेणेचे अनुषंगाने कार्यवाही.

७) शेत जमिनीचे/बिगर शेती स्थावर मालमत्तेचे मुल्यांकन त्वरीत मिळणेसाठी आवश्यक प्रयत्न.

८) अनेक पतसंस्था व बँकांनी मोठ्या प्रमाणावर विनातारणी कर्जे दिलेली आहेत. अशा कर्जाचे वसुलीसाठी कर्जदाराच्या स्थावर मालमत्तेचा शोध घेण्यासाठी आवश्यक प्रयत्न.

९) बेनामी किंवा गैरव्यवहाराद्वारे कर्जे घेऊन कर्जाची/संपत्तीची जवळच्या नातेवाईकांमध्ये हस्तांतरण केलेले असल्यास अशा लोकांचा व त्या व्यवहाराचा शोध घेऊन सदर मालमत्तेवरही बोजा चढविणेबाबत किंवा सदर मालमत्ता हस्तांतरणाचे व्यवहार रद्द करण्याबाबत कार्यवाही.

१०) कर्ज वसुलीसाठी संबंधीत कर्जदाराच्या मालमत्तेचा लिलाव करणेसाठी कर्जदाराच्या मालमत्तेचा शोध घेणे, मालमत्तेचे मुल्यांकन करणे व अपसेट प्राईस ठरवून देणे इ. बाबत आवश्यक कार्यवाही.

११) गैरव्यवहार केलेल्या संचालकांवर म.स.स. अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आर्थिक जबाबदारी निश्चित करुन जबाबदारी निश्चित झाल्यावर अशा दोषी संचालकांच्या मालमत्तेचा शोध घेऊन अशा मालमत्तेचा लिलाव व विक्री बाबतची कार्यवाही करणे.

४) वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी गठीत केलेल्या समितीचे आपण सदस्य सचिव आहात. त्यामुळे वरीलप्रमाणे कार्यवाही करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली आहे. मा. प्रधान सचिव (सहकार व पणन) यांनी दि. १९-८-२००८ चे अ.शा. पत्राद्वारे सर्व जिल्हाधिकारी यांना सदर प्रकरणी आवश्यक ते सहकार्य करण्याबाबत विनंती केलेली आहे. त्यानुषंगाने आपण स्वतः प्रत्येक प्रकरणात व प्रत्येक संस्थानिहाय आढावा घेऊन त्या त्या प्रमाणे प्रकरणनिहाय जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त यांना तसे पत्र किंवा समक्ष सभेत अडचणी सांगून त्या प्रमाणे त्यांचेकडून संबंधीत अधिकारी यांना निर्देश प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत व त्याप्रमाणे कार्यवाही होण्यासाठी पाठपुरावा करावयाचा आहे. तसेच संबंधीत अधिकारी यांचेकडून आवश्यक ते सहकार्य मिळत नसल्यास किंवा त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसल्यास सदर बाब मा. जिल्हाधिकारी यांचे निदर्शनास आणून देऊन त्या बाबत जिल्हाधिकारी यांचे पुढील आदेश घ्यावयाचे आहेत. त्यासाठी आपण साधारणपणे खालीलप्रमाणे कामकाज करावयाचे आहे.

१) कलम १०१ अन्वये दाखला प्राप्त झाल्यानंतर ज्या कर्जदाराचे संस्थेकडे कोणतेही तारण नाही अशा कर्जदारांच्या/जामिनदारांच्या स्थावर मालमत्तेचा महसूल विभागातील यंत्रणेच्या मदतीने शोध घेऊन अशा मालमत्तेवर पतसंस्थेच्या/बँकेच्या नावाचा बोजा नोंद करुन घेण्याची कारवाई करावी. सदर बाबत कोणतीही अडचण निर्माण झाल्यास वसूल करणेचे अनुषंगाने करण्यात येत असलेल्या कारवाया या बाबी दर आठवड्याला सभेपुढे ठेवाव्यात. सदर कारवाईचे अनुषंगाने काही अडचण असल्यास त्याबाबत जिल्हाधिकारी/जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे सहकार्याने त्या दूर कराव्यात.

अशा प्रकारे वर नमूद केल्याप्रमाणे तसेच प्रकरणनिहाय इतरही कामकाज आपले स्तरावर आपण स्वत: जबाबदारीने करावयाचे आहे. या बाबत येणाऱ्या अडचणीचे अनुषंगाने जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त यांचेशी चर्चा करुन सत्वर आवश्यक निर्देश संबंधीतांकडून प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. वरीलप्रमाणे कार्यवाही करुन होणाऱ्या कर्ज वसुलीतून ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याचे अनुषंगाने जिल्हास्तरावरील कृती समितीच्या सभेत नियोजन करुन त्याप्रमाणे ठेवी परत करण्याची कार्यवाही करावयाची आहे.

अडचणीतील नागरी सहकारी पतसंस्था व बँका यांचे संपूर्ण चाचणी लेखापरीक्षण हे अद्यापही पूर्ण झालेली नाही. काही प्रकरणात अद्याप आदेशच काढण्यात आलेले नाहीत तर काही प्रकरणात आदेश काढून बराच कालावधी होऊनही अद्याप चाचणी लेखापरीक्षण पूर्ण झालेली नाही. संबंधीत जिल्हा विशेष लेखापरिक्षक यांनी त्यांचे जिल्ह्यातील अशा पतसंस्थांचे चाचणी लेखापरीक्षण हे तात्काळ पूर्ण करुन घ्यावयाचे आहे. या बाबतची जबाबदारी वैयक्तीक त्यांची राहील या बाबत संबंधीतांनी नोंद घ्यावी.

अडचणीतील नागरी सहकारी पतसंस्थांमध्ये अशा प्रकरणात जबाबदारी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये कारवाई करणे आवश्यक असताना पुरेशा प्रकरणात अशी कारवाई करण्यात आलेली नाही. तर अनेक प्रकरणात कलम ८८ अन्वये कारवाई पूर्ण झाल्यानंतरही संबंधीत जबाबदार व्यक्तींकडून जबाबदारीची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही. सदर जबाबदारीची रक्कम तात्काळ वसूल करण्यात यावी.

वरीलप्रमाणे कार्यवाही होईल या बाबतची दक्षता सर्व संबंधीत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था व जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था यांनी घ्यावी. त्यांचे कामकाजावर विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन/लेखापरीक्षण) यांनी नियंत्रण ठेऊन केलेल्या व करीत असलेल्या कामकाजाबाबतचा आढावा दर आठवड्याला घ्यावा.

सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,
१) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था (सर्व)

प्रत पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना :
१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (लेखापरीक्षण) (सर्व)

अ. शा. पत्र क्र. पतसंस्था/ठेवी/कर्ज/व्याजदर/२००८
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
दिनांक १२ नोव्हेंबर २००८

**विषय : विभागातील खोटी अमिषे दाखविणाऱ्या तसेच सहकार विभागाने निश्चित केलेल्या व्याजदरापेक्षा ठेवी व कर्जावर अधिक दराने व्याज आकारणी करणाऱ्या पतसंस्थांवर कारवाई करणेबाबत...**

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

आपले विभागात कार्यरत असलेल्या अनेक पतसंस्था या ठेवीवर द.सा.द.शे. २० ते २४% पर्यंत व्याजदर देत असल्याबाबत तसेच ठेव गोळा करण्यासाठी ठेव संकलीत करणाऱ्या एजंटाना देखील ५ ते ७% कमिशन देत असल्याबाबत तक्रारी प्राप्त होत आहेत. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनने दि. २५-१०-२००८ च्या पत्रान्वये या संदर्भात विविध वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीची कात्रणे देखील या कार्यालयास सादर केलेली आहेत. त्यानुसार आपले विभागातील खालील पतसंस्थांच्या नियमापेक्षा अधिक व्याजदर देत असल्याबाबतच्या जाहिराती आहेत.

१) कलमन्ना मार्केट अर्बन क्रेडिट को-ऑप. सोसायटी नागपूर. २) युवा चैतन्य अर्बन क्रेडिट को-ऑप. सोसायटी नागपूर. ३) शारदा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., नागपूर. ४) छत्रपती सहकारी पतसंस्था मर्या., नागपूर.

या सर्व पतसंस्थांचे पदाधिकारी श्री. प्रमोद अग्रवाल हेच असून ठेव योजनेच्या संपर्कासाठी जाहिरातीत दिलेला मोबाईल क्रमांक ९८२२२०३४०० हा एकच आहे. याचाच अर्थ सदर व्यक्ती उपरोक्त पतसंस्थेसाठी अधिक व्याज दराची आमिषे दाखवून ठेवी गोळा करीत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

या कार्यालयाचे दिनांक २०-२-२००७ चे परिपत्रकान्वये राज्यातील पतसंस्थांचे व्याजदर निश्चित केलेले असून त्यानुसार ठेवीवरील कमाल व्याजदर ११% व कर्जावरील कमाल व्याजदर १५% निश्चित केलेला आहे. सदर परिपत्रकाचा भंग करुन काही पतसंस्था निश्चित केलेल्या व्याजदरापेक्षा अधिक व्याजदर आकारणी करीत असतील तर अशा पतसंस्थांवर तात्काळ कार्यवाही करण्याबाबत या कार्यालयाकडून वेळोवेळी सूचना/निर्देश देण्यात आलेले आहेत. मात्र त्यानुसार आपले विभागात संबंधित जिल्हा उपनिबंधक/तालुका निबंधक यांचेकडून काहीही कार्यवाही होत नसल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

सबब उपरोक्त ४ पतसंस्था या कोणत्या निबंधकांचे कार्यक्षेत्रातील आहेत व अशा पतसंस्थांवर संबंधीत निबंधकांकडून काय कार्यवाही करण्यात आलेली आहे तसेच त्यांचेकडून काही कार्यवाही करण्यात आलेली नसल्यास आपणाकडून संबंधीत निबंधकांवर काय कार्यवाही करण्यात आलेली आहे याबाबतची माहिती/खुलासा विनाविलंब या कार्यालयास सादर करावा. तसेच आपले विभागात अशाप्रकारे आणखी काही पतसंस्था जास्तीचे व्याजदर देत आहेत किंवा कसे या बाबतचीही तपासणी करण्यात यावी. व अशा बाबी निदर्शनास आल्यास राज्यस्तरीय पतसंस्थांसह सर्व पतसंस्थांवर आवश्यक ती कारवाई करण्याबाबत संबंधीत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी निर्देश द्यावेत. या कार्यालयाने दि. २५-८-२००८ चे परीपत्रकान्वये राज्यस्तरीय पतसंस्थांबाबतचे अधिकारही संबंधीत जिल्हा उपनिबंधक यांना अलाहीदा प्रदान केलेले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील पतसंस्थांवर योग्य ते नियंत्रण ठेवणे व पतसंस्था दिलेल्या आदेशांचा भंग करीत असल्यास

अशा पतसंस्थांवर संबंधीत जिल्हा उपनिबंधक यांनी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र आपले विभागातील जिल्हा/तालुका निबंधक हे जाणीवपूर्वक अशी कार्यवाही करीत नसतील तर ती अतिशय गंभीर बाब असून, संबंधीत निबंधकांवर कर्तव्यात कसूर केल्याचे कारणास्तव शिस्तभंग विषयक कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब आपणास कळविण्यात येते की, आपले विभागातील सर्व पतसंस्था शासनाने व निबंधकांने ठरवून दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी करतात किंवा कसे याबाबतची तपासणी करून ज्या पतसंस्था नियम, पोटनियम व परिपत्रकीय निर्देशांचा भंग करून कामकाज करीत आहेत तसेच ठरवून दिलेल्या व्याजदरापेक्षा अधिक व्याजदराची अमिषे दाखवित आहेत अशा पतसंस्थांवर तात्काळ कारवाई करण्याबाबत जिल्हा उपनिबंधक यांना निर्देश देऊन त्यांचे जिल्ह्यात अशाप्रकारे नियमबाह्य कामकाज करणाऱ्या पतसंस्थांवर तात्काळ वैधानिक कारवाई करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत जिल्हा उपनिबंधक यांची राहणार असल्याबाबत आपले स्तरावरुन पुन्हा एकदा योग्य ती जाणिव करून द्यावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

आपला

(डॉ. कृष्णा लव्हेकर)

श्री. दुष्यंत सिडाम,
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर

**प्रत माहिती व पुढील तात्काळ कार्यवाहीसाठी रवाना :**
विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व) व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)

त्यांना कळविण्यात येते की, त्यांचे विभागात/जिल्ह्यातही अशाप्रकारे अनेक पतसंस्था निश्चित केलेल्या व्याजदरापेक्षा अधिक व्याजदराने व्यवहार करीत असल्याचे वर्तमानपत्रातील जाहिरातीवरुन तसेच विविध तक्रार अर्जावरुन निदर्शनास येते. अशा प्रकरणात संबंधीत पतसंस्थेवर संबंधीत जिल्हा उपनिबंधक यांचेकडून तात्काळ कार्यवाही होणे आवश्यक आहे. मात्र संबंधीत जिल्हा उपनिबंधक हे या बाबीकडे डोळेझाक करीत असतील तर हे गंभीर स्वरुपाचे गैरवर्तन असून उक्त कृती ही महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगात्मक कार्यवाहीस पात्र आहे. सबब सर्व जिल्हा उपनिबंधक यांना या पत्राद्वारे निर्देश देण्यात येतात की, आपले विभागात/जिल्ह्यात कोणतीही पतसंस्था या कार्यालयाने निश्चित केलेल्या व्याजदरापेक्षा अधिक व्याजदर देणार नाहीत याबाबतची दक्षता घेण्यात यावी. या बाबतची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत जिल्हा उपनिबंधक यांची राहील या बाबतची त्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी. अन्यथा त्यांचे विरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा अशा प्रकारच्या बाबी पुन्हा निदर्शनास आल्यास त्याबाबत संबंधीत जिल्हा उपनिबंधक यांना जबाबदार धरून त्यांचे विरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार पुढील शिस्तभंगात्मक कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत : चेअरमन/व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., सुरक्षा भवन प्लॉट नं. ९, इंडस्ट्रीयल इस्टेट, गुलटेकडी, पुणे ३७. यांना माहितीस्तव रवाना.

जा. क्र. ना. बँका/डी-४/पतसंस्था/कर्ज-ठेवी/व्याजदर/०८
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१ यांचे कार्यालय,
दिनांक १२-११-२००८

# परिपत्रक

## विषय : नागरी/ग्रामीण बिगरशेती/सेवक सहकारी पतसंस्थांचे ठेवी व कर्जावरील व्याजदराबाबत

राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या ठेव व कर्जावरील व्याजाची तीव्र स्पर्धा टाळण्यासाठी नागरी सहकारी पतसंस्थांचे आदर्श उपविधीमध्ये पोटनियम क्र. फ १.११ नुसार कर्जावरील व्याजदर व पोटनियम क्र. फ. १.१३ नुसार ठेवीवरील व्याजदर अनुक्रमे १६% व १३% करण्यात आलेले होते. तदनंतर जागतिक आर्थिक तेजी-मंदीमुळे सर्वच वित्तीय संस्थांचे व्याजदर कमी जास्त होत असल्यामुळे या कार्यालयाकडूनही वेळोवेळी कर्जावरील व ठेवीवरील व्याजदरात बदल करण्यात आले. या कार्यालयाच्या दि. २०-०२-२००७ च्या परिपत्रकानुसार पोटनियम क्र. फ. १.११ मध्ये बदल करुन कर्जावरील कमाल व्याजदर १५% तर पोटनियम क्र. फ. १.१३ मध्ये बदल करुन ठेवीवरील कमाल व्याजदर हा ११% करण्यात आलेला आहे.

दरम्यान सद्यस्थितीत जागतिक अर्थव्यवस्थेत होत असणाऱ्या बदलास अनुसरुन सर्वच वित्तीय संस्थांनी त्यांचे व्याजदरात वाढ केलेली आहे. तसेच रिझर्व्ह बँकेनेही नागरी बँकांना त्यांचे व्याजदराबाबत निर्णय घेण्याची बँकांचे स्तरावर मुभा दिलेली आहे. ही बाब विचारात घेता अनेक नागरी पतसंस्था/फेडरेशन यांनीही त्यांचे व्याजदरात वाढ करण्यास त्याबाबतचा निर्णय स्वतंत्ररित्या संस्थांस्तरावर घेण्यास परवानगी देण्याबाबत विनंती केलेली होती. सदर विनंती तसेच त्यानुषंगाने पतसंस्था फेडरेशनच्या विविध पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे केलेली मागणी विचारात घेता, सदर बाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

राज्यातील नागरी/ग्रामीण बिगरशेती/सेवक सहकारी पतसंस्थांनी त्यांचे कर्जावरील व ठेवीवरील व्याजदर हे संस्थेचा Average Landing Rate (ALR) व Average Borrowing Rate (ABR) विचारात घेऊन व संस्थेस कोणत्याही प्रकारे नुकसान होणार नाही याची दक्षता घेऊन संस्थेस त्यांचे स्तरावर व्याजदर निश्चित करणेबाबतचा निर्णय घेण्यास परवानगी देण्यात येत आहे. त्यानुसार संस्थेने त्याचा ALR व ABR विचारात घेऊन त्याप्रमाणे संस्थेचे ठेवी व कर्जावरील व्याजदर ठरविण्यात यावेत. संस्थेचा ALR व ABR हा संस्थेच्या अंतर्गत लेखापरीक्षकाने प्रमाणित करणे आवश्यक आहे. ALR व ABR यामधील दुरावा हा किमान ३% असावा. तसेच ठेवीवरील व्याजदर ठरविताना Asset Liability Management प्रमाणे नेमका Miss-Match कोणत्या बकेटमध्ये आहे या बाबीचाही विचार करण्यात यावा.

ALR व ABR ठरविण्याची पद्धती खालीलप्रमाणे :

ABR ठेवींचा सरासरी दर = वर्षभरात ठेवीवर दिलेले व्याज
(Interest Paid during the year) X 100
वर्षभरातील ठेवींची सरासरी
(Average doposit during the year)

२) ALR व कर्जाचा सरासरी दर = वर्षभरात कर्जावर मिळालेले व्याज
(Interest received during the year) X 100
वर्षभरातील कर्जाची सरासरी
(Average loan during the year)

३) ALR व ABR = Spred (दुरावा)

४) दुरावा – प्रशासकीय खर्च = नफा

५) वर्षभरातील ठेवींची सरासरी = वर्षभरात जनरल लेजरप्रमाणे दर महिना अखेरील सर्व ठेवींची एकत्रित रक्कम (बेरीज) ÷ १२

६) वर्षभरातील कर्जाची सरासरी = वर्षभरात जनरल लेजरप्रमाणे दर महिना अखेरील सर्व कर्जाची एकत्रित रक्कम (बेरीज) ÷ १२

वरीलप्रमाणे निश्चित केलेल्या व्याजदराचे अनुषंगाने निधी उपलब्ध करताना, ठेवी स्विकारताना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ३५ मधील तरतुदींचा भंग होणार नाही म्हणजेच संस्था त्यांच्या स्वनिधीच्या १० पटीपेक्षा अधिक रकमेच्या ठेवी स्विकारणार नाही याबाबतची दक्षता संबंधीत संस्थेने व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी घ्यावी.

मात्र वरीलप्रमाणे ठेवी व कर्जावरील व्याजदर निश्चित करताना जिल्ह्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या व्याजदराच्या २% पेक्षा किंवा इतर राष्ट्रीयकृत/सहकारी बँकेच्या व्याजदराच्या १% पेक्षा अधिक नसावेत या बाबतची दक्षता घेण्यात यावी.

लेखापरीक्षकांनी पतसंस्थेचे लेखापरीक्षण करताना संस्थेच्या ठेवी व कर्जावरील व्याजदराबाबत तपासणी करून, संस्थेने स्विकारलेले व्याजदर हे परीपत्रकीय निर्देशानुसार योग्य आहेत किंवा कसे याबाबत खातरजमा करावी व लेखापरीक्षण अहवालात या बाबी नमूद कराव्यात.

वरीलप्रमाणे कार्यवाही करून पतसंस्थांनी त्यांचे कर्ज व ठेवीवरील व्याजदर ठरविण्याबाबत त्यांचे स्तरावर निर्णय घेण्यास पतसंस्थांना परवानगी देण्यात येत आहे.

**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति,
१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन/लेखापरीक्षण) (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३) जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था (सर्व)
४) महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.
५) जिल्हा पतसंस्था फेडरेशन
६) निवडनस्ती.

राज्यातील अडचणीतील नागरी/ग्रामीण
बिगरशेती पतसंस्थांच्या ठेवीदारांच्या
ठेवींच्या रकमा परत करण्यासाठी
अर्थसहाय्य करणेबाबत...

# महाराष्ट्र शासन

## शासन निर्णय क्रमांक सीसीआर – ११०९/प्र. ५८६/७–स

## सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग

## मंत्रालय, मुंबई ३२

## दिनांक : ४ ऑगस्ट २००९

**प्रस्तावना :**

"महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाखाली नोंदणीकृत एकूण १७,२७८ इतक्या नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था कार्यरत आहेत. त्यापैकी सन २००७ मध्ये सुमारे ४६२ पतसंस्था आर्थिक गैरव्यवहार व इतर कारणांमुळे अडचणीत आल्या असून अशा अडचणीतील संस्थांना आपल्या ठेवीदारांच्या ठेवीच्या रकमा ठेवीदारांना परत करण्यात अडचणी येत आहेत. रु. १०,००० पर्यंत ठेवी असलेल्या सभासदांना शासनाने त्यांच्या ठेवी संबंधित संस्थांकडून परत मिळण्यास अर्थसहाय्य करावे अशी मागणी शासनाकडे करण्यात येत होती. त्या अनुषंगाने राज्यातील अडचणीतील नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांच्या ठेवीदारांच्या अडचणी लक्षात घेता काही पमाणात ठेवीदारांना मदत करण्याच्या हेतूने, अडचणीतील पतसंस्थेमधील दारिद्र्य रेषेखालील विधवा व सेवानिवृत्तीधारक ठेवीदार यांना ठेवी तात्काळ परत करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी रु. २०० कोटी पर्यंतच्या मर्यादेत बिनव्याजी कर्जाच्या स्वरुपात पतसंस्थांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

यानुसार राज्यातील अडचणीतील नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांच्या ठेवीदारांच्या ठेवीच्या रकमा परत करण्यासाठी या संस्थांना सुमारे रु. २०० कोटी इतक्या रकमेचे बिनव्याजी कर्जाच्या स्वरुपात अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाची मान्यता देण्यात येत असून त्याबाबतचे निकष खालीलप्रमाणे राहतील.

१) दारिद्र्य रेषेखालील, विधवा व सेवानिवृत्तीधारक ठेवीदार त्यांच्या प्रत्यक्ष ठेवी किंवा रु. १०,०००/– पर्यंत ठेवी परत मिळण्यास पात्र राहतील.

२) पूर्वी रु. १०,००० किंवा त्यापेक्षा जास्त लाभ मिळालेले वरील संवर्गातील ठेवीदार या लाभासाठी अपात्र राहतील.

३) ठेवी परत करताना शासनाकडील निधी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेद्वारे ठेवीदारांना परत मिळतील.

४) निधी पतसंस्थांना शासनातर्फे एक वर्षासाठी बिनव्याजी कर्ज स्वरुपात देण्यात येईल.

५) निधीची परतफेड या काळात कर्जदारांकडून सक्तीने वसूल करून घेणे संस्था चालकांवर बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे हे जबाबदार राहतील. तसेच सदर ठेवी संबंधित ठेवीदारांना परत करण्याबाबतची कार्यपद्धती सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी निश्चित करून त्यांची काटेकोर अंमलबजावणी करून त्या बाबतच्या कार्यवाहीचा अहवाल शासनास वेळोवेळी सादर करण्याची जबाबदारी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ दि. २९-७-२००९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २००९०८०४१२०७५७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने

(आ. ना. भोंडवे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
२) मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
३) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
४) सर्व विभागीय आयुक्त
५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
६) सर्व जिल्हाधिकारी
७) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
८) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
९) सर्व कार्यकारी संचालक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका
१०) सी. जी. एम. नाबार्ड व सर्व डी. डी. एम. नाबार्ड
११) सर्व लीड बँक व्यवस्थापक, सर्व जिल्हे
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा
१३) मुख्य अधिकारी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, ॲग्रीकल्चरल क्रेडिट डिपार्टमेंट, सेंट्रल ऑफिस, गारमेन्ट हाऊस, मुंबई १८.
१४) उपमुख्य अधिकारी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, ॲग्रीकल्चरल क्रेडिट डिपार्टमेंट, बॉम्बे रिजनल ऑफिस, गारमेन्ट हाऊस, मुंबई १८.
१५) सहव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई
१६) व्यवस्थापक, सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका
१७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१८) नियोजन विभाग, मंत्रालय
१९) वित्त विभाग व्यय-२/बीयुडी-१२, मंत्रालय
२०) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
२१) निवड नस्ती कार्यासन ७-स, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

राज्यातील नागरी सहकारी बँका/पतसंस्थामधील
ठेवी परत करण्याच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय
कृति समितीस मुदतवाढ देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक – युआरबी–१५०७/शिकाना प्र. क्र. ४७/७–स.
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १८–८–२००९
वाचा : शासन निर्णय समक्रमांक दिनांक १३–८–२००९

**प्रस्तावना :**

राज्यातील नागरी सहकारी बँका/पतसंस्था यांच्या कामकाजाबाबत वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या तक्रारी, त्यानुषंगाने सहकार विभागामार्फत सहकार कायद्याच्या विविध कलमांतर्गत करण्यात येणारी कार्यवाही, सदर कामात सातत्य रहावे व या कामाला गती मिळावी या उद्देशाने अशा प्रकारच्या प्राप्त तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी श्री. रत्नाकर गायकवाड, तत्कालीन प्रधान सचिव (सहकार) तथा महानगर आयुक्त, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय क्र. सीसीआर-११०७/प्र. क्र. ५८३/७-स, दि. ७-८-२००७ अन्वये राज्यस्तरीय कृती समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. शासन निर्णय दि. १३-८-२००८ नुसार सदर समिती श्री. सुधीरकुमार गोयल (भा. प्र. से.) प्रधान सचिव (सहकार) यांचे अध्यक्षतेखाली कार्यरत आहे.

तथापि दि. ५-११-२००७ रोजी राज्यस्तरीय कृती समितीच्या बैठकीत ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी सहकार, महसूल व गृह विभाग यांच्या समन्वयाची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. त्याअनुषंगाने प्राप्त तक्रारींवरील कार्यवाहीच्या कामामध्ये सातत्य रहावे, कामाला गती मिळावी या उद्देशाने तक्रारींवर कार्यवाही करून ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय कृती समिती स्थापन करण्याबाबत विचारविनिमय झाला. त्यानुसार नागरी सहकारी बँका/पतसंस्था यांचे कामकाजाबाबत तसेच ठेवीदारांच्या ठेवींबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निराकरन करून ठेवी परत करण्याच्या कामकाजास गती मिळावी यासाठी शासन निर्णय समक्रमांक दिनांक १३-८-२००८ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कृती समितीची स्थापना करण्यात आली होती. सदर समितीची मुदत सहा महिनेपर्यंत होती.

राज्यातील ठेवीदारांच्या ठेवी परत मिळण्याच्या अनुषंगाने अद्यापही मोठ्या प्रमाणात जनआंदोलन सुरु असल्याने, त्या अनुषंगाने अडचणीतील पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या ठेवी परत मिळण्याच्या अनुषंगाने दोषी संचालक/कर्जदार/लेखापरिक्षक यांच्यावर गुन्हा दाखल करणे, गैरव्यवहारातील रक्कमा संबंधित कर्जदार/संचालक मंडळ यांचेकडून वसूल करणे, अडचणीतील पतसंस्थेचे सक्षम पतसंस्थेमध्ये विलीनीकरण करणे इ. प्रकारची कार्यवाही चालू असल्याने त्यासाठी जिल्हास्तरीय कृती समितीच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असल्याने सदर जिल्हास्तरीय कृती समितीस एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

राज्यातील ठेवीदारांच्या ठेवी परत मिळण्याच्या अनुषंगाने अद्यापही मोठ्या प्रमाणात जनआंदोलन सुरू असल्याने त्या अनुषगांने अडचणीतील पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या ठेवी परत मिळण्याच्या अनुषंगाने दोषी संचालक/कर्जदार/लेखापरिक्षक यांच्यावर गुन्हा दाखल करणे. गैरव्यवहारातील रक्कमा संबंधित कर्जदार/संचालक मंडळ यांचेकडून वसूल करणे, अडचणीतील पतसंस्थेचे सक्षम पतसंस्थेमध्ये विलीनीकरण करणे इ. प्रकारची कार्यवाही चालू असल्याने त्यासाठी जिल्हास्तरीय कृती समितीच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असल्याने सदर जिल्हास्तरीय कृती समितीस एक वर्षाची म्हणजेच दि. १३-२-२००९ पासून दि. १२-२-२०१० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर समितीस नागरी सहकारी बँका/पतसंस्थांमधील ठेवी परत करण्याच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी पूर्ण अधिकार देण्यात येत आहेत. सदर समितीच्या सभा महिन्यातून किमान दोन वेळा किंवा आवश्यकता असल्यास अधिक वेळा होतील तसेच समितीचे पदाधिकारी आणि समितीचे कामकाज शासन निर्णय क्र. युआरबी १५०७/शिकाना प्र. क्र. ४७/७ स दिनांक १३-८-२००८ प्रमाणेच राहतील. तसेच सदर समिती शासनास वेळोवेळी अहवाल सादर करेल.

(अ. ना. भोंडवे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग.

जा. क्र. ना. बँका/डी-४/कृती समिती/मुवा/०९/१५३६
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
दिनांक : २९ ऑगस्ट २००९

प्रति,
१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

उपनिबंधक (ना. बँका-२)
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे